# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३३६ - २२** **दिनांक १२/११/२०२२**

## ऑक्टोबर महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) वालीव पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडी व चोरी करणारे आरोपीत यांचा गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या व तांत्रिक माहितीच्या आधारे वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाने तपास करुन गुन्हे अभिलेखावरील आरोपी व इतर आरोपी नामे १) शमीम ऊर्फ राजा रमजान अन्सारी, सातीवली, वसई (पुर्व), २) बालकराम ऊर्फ मुन्ना रामकिशन विश्वकर्मा, पटेल इंड्रीस्ट्रीयल, वसई (पुर्व), ३) वलीऊल्ला शफीऊल्ला चौधरी, धुमाळनगर, वालीव, वसई (पुर्व), ४) चॉंद ऊर्फ हामीद शफीक अहमद रईन, धुमाळनगर, वसई (पुर्व) यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत व निर्मळनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्याकडून वालीव पोलीस स्टेशनकडील खालील नमूद गुन्हे उघडकीस आणून गुन्हयात चोरीस गेलेली मोटार सायकल, रोख रक्कम, कंपनीतील लोंखडी व स्टील पार्ट, सोन्याचे व चांदीचे दागिने, वाहनाच्या बॅट-या व चाके, मोबाईल असा एकुण ४,६३,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला होता.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजिस्टार नंबर व कलम. |
|---|---|---|
| १. | वालीव | गु.र.नं. ९३५/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३७९ प्रमाणे. |
| २. | वालीव | गु.र.नं. ९४३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३८० प्रमाणे. |
| ३. | वालीव | गु.र.नं. ८७४/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३८० प्रमाणे. |
| ४. | वालीव | गु.र.नं. १०८२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे. |
| ५. | वालीव | गु.र.नं. १०८७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ६. | वालीव | गु.र.नं. ५४९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ७. | वालीव | गु.र.नं. १०३०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७,३८० |
| ८. | वालीव | गु.र.नं ११२४/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३८० प्रमाणे. |
| ९. | वालीव | गु.र.नं १०७२/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३८०,३४ प्रमाणे. |
| १०. | वालीव | गु.र.नं ४७६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ११. | वालीव | गु.र.नं १६७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० |
| १२. | वालीव | गु.र.नं ६६८/२०२२ भा.दं.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० |

| | | |
|---|---|---|
| १३. | निर्मळनगर (मुंबई) | गु.र.नं । १०३०/२०२२ भा.दं.वि.सं कलम ३७९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी करणाऱ्या वालीव पोलीस स्टेशनच्या श्री. कैलास बर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मिलींद साबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, पो.ना.बाळु कुटे, सतिष गांगुर्डे, पो.अं. गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांचा दिनांक १२/११/२०२२ रोजी श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री कैलास बर्वे**

२) नालासोपारा पोलीस ठाणे येथे दिनांक २२/०८/२०२२ रोजी तक्रारदार सलमा अब्दुल मेहतर वय- ४४ वर्षे यांनी तक्रार दिली की, तक्रारदार या दिनांक २१/०८/२०२२ रोजी रात्रीच्या सुमारास घराबाहेर रस्त्यावर फोनवर बोलत असतांना कोणीतरी अनोळखी इसमाने फिर्यादीचे मानेवर मागील बाजूस कशाने तरी मारहाण करुन फिर्यादीस बेशुध्द केले, तसेच फिर्यादीचे डावे कानाला कुठल्यातरी तिक्ष्ण हत्याराने वार करुन दुखापत केली व नंतर फिर्यादीस चाकूचा धाक दाखवुन त्यांचे नाकातील साधारण दोन ग्रम वजनाची सोन्याची चमकी, ७५०/- रुपये रोख व सॅमसंग कंपनी ऐ ३० हा मोबाईल असा एकुण १०,७५०/-रुचा ऐवज घेवून जबरीने घेवून गेला. सदरबाबत नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. । ३४८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९४, ३४२, ५०६ प्रमाणे अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीकोनातून नालासोपारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपी हा नालासोपारा पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहण्यास असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. संशयीताबाबत अधिक माहिती प्राप्त करुन आरोपी नामे शिफत हबीबुर शेख वय-१९ वर्षे रा. निळेमोरे, नालासोपारा पश्चिम यास दिनांक १७/१०/२०२२ रोजी अटक करण्यात आली व अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये मागील काही दिवसामध्ये केलेल्या खालीलप्रमाणे ०७ गुन्हयांची कबुली दिली असून त्याचेकडून गुन्हयात चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ७,४०,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता.

| **अनु.क्र** | **गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम** |
|---|---|
| ०१ | गुन्हा रजि. नं. I ३४८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९४, ३४२, ५०६ अन्वये |
| ०२ | गुन्हा रजि. नं. I ३५५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०३ | गुन्हा रजि. नं. I ३७३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०४ | गुन्हा रजि. नं. I ४५७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०५ | गुन्हा रजि. नं. I ४६८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०६ | गुन्हा रजि. नं. I ४७०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०७ | गुन्हा रजि. नं. I ४७४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |

सदरची कामगिरी करणाऱ्या नालासोपारा पोलीस स्टेशनच्या श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/पंडीत मस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, अमोल तटकरे, पोशि/ कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, प्रतिक पिंगळे, पोना/ढोणे (नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय) यांचा दिनांक १२/११/२०२२ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री विलास सुपे**

३) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात घरफोडी, जबरी चोरी, वाहन चोरीच्या गुन्हयात वाढ होत असल्याने सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे एक विशेष पथक नेमण्यात आले होते.

सदर पथकातील स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा.शिवाजी पाटील यांना सराईत गुन्हेगार वाकणपाडा, नालासोपारा (पुर्व) येथे घरफोडी, जबरी चोरी गुन्हयात चोरी केलेला मुददेमाल विक्री करण्याकरीता येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाल्याने, मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने वाकणपाडा, नालासोपारा (पुर्व) या परिसरात नमूद पथकाने सतत दोन दिवस सापळा रचुन दिनांक २८/१०/२०२२ रोजी मोटारसायकल वरून येणारा इसम नामे नुरउददीन उर्फ छोटु कमरुददीन शेख, वय २२ वर्ष, राह. रेणुकानगर गल्ली, वाकणपाडा, नालासोपारा (पुर्व) यास ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीत त्याच्याकडे सोन्याचे दागिने, ५ मोबाईल फोन व एक मोटार सायकल असा एकूण १,२५,९९०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमालाबाबत त्याचेकडे विचारपुस करता त्याने ते चोरी केले असल्याचे सांगितल्याने, सदर मुद्देमालावरुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस ठाण्यास दाखल अभिलेखावरील गुन्हयांची पाहणी केली असता सदर मुददेमाल हा खालील नमूद पेल्हार व वालीव पोलीस ठाण्यास दाखल गुन्हयातील चोरीस गेलेला मुददेमाल असल्याचे निषन्न झाले तसेच सदर इसम हा गुन्हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुध्द घरफोडी व जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास पुढील योग्य त्या कारवाईकामी पेल्हार पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे. अशाप्रकारे नमूद आरोपीताकडुन घरफोडी चोरीचे ०२, जबरी चोरीचे ०४ व वाहन चोरीचा ०१ गुन्हा असे एकूण ०७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.९०५/२०२२भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. |

| | | |
|---|---|---|
| २. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.४६८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे. |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.७२५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ४. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.७९३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ५. | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.नं..२५९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ६. | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.नं.९१३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ७. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.३९३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी करणाऱ्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.उ.नि. चंद्रकांत पोशिरकर, पो.हवा. शिवाजी पाटील, मनोहर तावरे, पो.अं. सुशील पवार, जयकुमार राठोड यांचा दिनांक १२/११/२०२२ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **ऑक्टोबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पोनि. श्री राहुल राख**

**---000---**